जा.क्र. मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 663 /२०२३
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्राधिकरण
कक्ष क्र. ५१८, चवथा मजला,
गृहनिर्माण भवन, बांद्रा (पुर्व),
मुंबई ४०००५१
दि. 11/07/2023

# दक्षता विभागाचे परिपत्रक - १

विषय- म्हाडाच्या हिश्श्यातील सदनिका सदर सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यांनतरच ताब्यात घेणेबाबत

विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मधील तरतुदीनुसार तसेच म्हाड अधिनियम - १९७६मधील तरतुदीनसार इमारतीच्या पुनर्विकासातून निर्माण होणा-या सदनिकांपैकी काही सदनिका म्हाडाच्या हिश्श्यामध्ये येतात. म्हाडाने सदर सदनिका ताब्यात घेण्यापूर्वी अशा सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे किंवा कसे याची शहानिशा करुन भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच सदनिका ताब्यात घेणे आवश्यक आहे.

तथापी या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की म्हाडाच्या हिश्श्यातील सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेले नसताना देखील सदनिका ताब्यात घेतल्या जातात. सदर बाब गंभीर स्वरुपाची आहे.

यास्तव या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की पुनर्विकास प्रकल्पातील म्हाडाच्या हिश्श्यातील सदनिका, इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच ताब्यात घेण्यात याव्यात.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

o/c
07/07/2023

प्रती,
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ/कोंकण मंडळ/ नाशिक मंडळ/ पुणे मंडळ/अमरावती मंडळ / नागपूर मंडळ/ औरंगाबाद मंडळ

प्रत,
अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांना माहीतीसाठी सादर
उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्रा यांना माहीतीसाठी सादर.